



# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २८० वा ❑ मंगळवार दि.०६ जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### जल ही जीवन मृत्यूचा घोट बनला

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

पाणी हे जीवन आहे जल ही जीवन है हे प्रसिद्ध घोष आपण सर्वांनी ऐकले आणि वाचले असालच . आता कल्पना करा, जर पाणी, जीवनासाठी आवश्यक असेल; जर ते मृत्यूचे कारण बनले तर...हे प्रत्यक्षात घडले आहे हे जाणून तुम्हाला धक्का बसेल. देशातील सर्वात स्वच्छ शहर इंदूर... अन्नासाठी प्रसिद्ध असलेले शहर... आज सर्वत्र बातम्यांमध्ये आहे. यावेळी, कारण अगदी उलट आहे. इंदूरमधील भगीरथपुरा येथे, १५ जणांनी आपले जीवन वाचवण्यासाठी जे पाणी प्यायले ते त्यांच्यासाठी विष बनले, ज्यामुळे त्यांचा अकाली मृत्यू झाला.

काही घरांमध्ये, प्रार्थनापूर्वक जगण्याचा प्रकाश अकाली विझला, तर काहींमध्ये, कमावणारा मरण पावला. काहींमध्ये, संपूर्ण कुटुंबासाठी भाकरी बनवणारे हात कमकुवत झाले आणि काहींमध्ये, तरुण आकांक्षा मरण पावल्या.

कारण– व्यवस्थेची बेजबाबदार वृत्ती... सरकारी अधिकाऱ्यांची कुंभकरणीय झोप आणि सामान्य लोकांना त्यांच्या नशिबावर सोडण्याची त्यांची कार्यशैली... भगीरथपुरा रक्ताचे अश्रू ढाळत आहे, परंतु ही केवळ इंदूरची दुःखद कहाणी नाही ज्याने स्वच्छतेत आघाडीवर राहिल्याबद्दल सात वेळा स्वतःच्या पाठीवर थाप मारली आहे, तर ही देशभरातील कोट्यवधी लोक अशाच दूषित पाण्याने जगत असल्याची धक्कादायक कहाणी आहे.भारतातील पाण्याच्या दूषिततेकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

दूषित पाण्यामुळे होणारे मृत्यू अत्यंत चिंताजनक आहेत, कारण यामुळे कॉलरा, टायफॉईड, अतिसार (जुलाब) यांसारखे गंभीर आजार पसरतात, ज्यात लहान मुलांचा बळी जास्त जातो, जागतिक स्तरावर दरवर्षी लाखो मृत्यू होतात आणि भारतातही इंदूरसारख्या शहरांमध्ये अलीकडेच दूषित पाण्यामुळे अनेक मृत्यू झाले आहेत, ज्यामुळे प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पाणी दूषित होण्याची कारणे म्हणजे सांडपाणी, औद्योगिक कचरा आणि खराब पाईपलाईन आहेत, ज्यामुळे जिवाणू, विषाणू आणि रासायनिक पदार्थांचा प्रसार होतो, जे मानवी आरोग्यासाठी धोकादायक आहेत.

भारतात शुद्ध पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर आहे आणि कोट्यवधी लोक सुरक्षित पाण्यापासून वंचित आहेत.नीति आयोगाच्या अहवालानुसार, देशातील सुमारे ६० कोटी लोक तीव्र जलतणावाखाली जगत आहेत. अलीकडील

इंदूरमधील भागीरथपुरा भागात दूषित पाण्यामुळे अनेक मृत्यू झाले, ज्यात सांडपाणी पिण्याच्या पाईपलाईनमध्ये मिसळले होते.ज्या परिसरात ही घटना घडली, त्या ठिकाणी सुमारे १५,००० लोक राहतात. दूषित पाणीपुरवठ्यामुळे दिवसभर महिला आणि मुलांसह नवीन रुग्ण समोर येत राहिले. त्यानंतर काहींची तब्येत इतकी खालावली की, थेट त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे आरोग्य विभागावर प्रश्नचिन्ह उभे राहिले असून, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

या आधी देखीलमेळघाटात दूषित पाण्यामुळं दोघांचा मृत्यू झाला होता.भारतातील लाखो लोकांना अजूनही सुरक्षित पिण्याचे पाणी मिळत नाही.जागतिक आरोग्य संघटना () आणि युनिसेफ यांनी वारंवार इशारा दिला आहे की असुरक्षित पिण्याचे पाणी एक गंभीर धोका निर्माण करते आणि सुरक्षित आणि व्यवस्थापित पिण्याच्या पाण्याची उपलब्धता प्रत्येकासाठी आवश्यक आहे. ते असेही निदर्शनास आणून देतात की ज्या देशांमध्ये पाण्याची गुणवत्ता खराब आहे, त्या देशांमध्ये आरोग्य व्यवस्थांवरील भार वाढेल आणि विकास मंदावू शकतो.मात्र स्वातंत्र्याच्या ७९ वर्षानंतर देखील आम्हीं सर्वसामान्य नागरिकांना मूलभूत गरजा पुरवू शकलो नाही..असे खेदाने म्हणावे लागत आहे.मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य दळणवळण  आणि शिक्षणासारख्या आवश्यक गोष्टींकडे दुर्लक्ष करणे, ज्यामुळे व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक विकासावर गंभीर परिणाम होतो, जसे की बालकांमध्ये कुपोषण, भावनिक पोकळी निर्माण होणे, आणि प्रौढांमध्ये असुरक्षितता व नैराश्य येऊ शकते; याकडे दुर्लक्ष केल्यास व्यक्तीचे कल्याण धोक्यात येते आणि दारिद्र्याचे दुष्टचक्र सुरू राहते.

# मराठी ही केवळ संवादाची नव्हे, तर रोजगाराची भाषा व्हावी-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## सातारा येथे ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप

ज्योतिर्मय साहित्य

**सातारा –** मराठी भाषा हा आपल्या संस्कृतीचा आत्मा, अस्मिता, अभिमान आहे.  ही भाषा संपली तर आपले अस्तित्व संपेल याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे. मराठी केवळ संवादाची भाषा न राहता ती रोजगाराची भाषा झाली पाहिजे. तिचे व्यावसायिक महत्त्व टिकवून ठेवत मराठीचे वैभव, दरारा आणि मराठीचा दिमाख कायम ठेवणे हे आपले केवळ कर्तव्य नसून ती अत्यंत पवित्र अशी जबाबदारी आहे. या साहित्य संमेलनाला शासनाने ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. यापुढेही अशा साहित्य संमेलनांना निधी कमी पडणार नाही, हे पाहणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे भाषेच्या विकासासाठी व संवर्धनासाठी शासन सर्वतोपरी मदत करेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे सातारा येथे १ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात आले होते. याचा समारोप कार्यक्रम उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या समारोप कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ साहित्यिक रघुवीर चौधरी होते. यावेळी  उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, पालकमंत्री शंभूराज देसाई, संमेलनाचे स्वागताध्यक्ष सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य समेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, आमदार महेश शिंदे, कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, नगराध्यक्ष अमोल मोहिते, नगर प्रशासन अधिकारी अभिजीत बापट, भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, उद्योजक, मंडळाचे कार्यवाहक सुनिताराजे पवार व संमेलनाचे संरक्षक फरोख कूपर आदी उपस्थित होते.

साताऱ्याच्या भूमीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची पायाभरणी झाली.  त्या पवित्र भूमीत ९९ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन ही आपल्या सगळ्यांसाठी अभिमानाची आणि गौरवाची बाब




आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, हे संमेलन केवळ साहित्यिक कार्यक्रम नाहीतर मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेचा सांस्कृतिक आत्मविश्वासाचा आणि विचारस्वातंत्र्याचा उत्सव आहे. हे संमेलन साहित्याचा आणि मराठी भाषेचा महाकुंभ आहे. मराठी भाषेच्या सर्व प्रवाहांचा संगम आहे. या संमेलनाला साताऱ्याच्या कंदीपेढ्याचा गोडवा लाभला आहे. इथल्या लोकांच्या हृदयात प्रेमाची स्ट्रॉबेरी भरलेली आहे.  शंभरावे साहित्य संमेलनदेखील जोरदार झाले पाहिजे. त्यालाही शासन काही  कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी मराठी भाषेला अभिजात भाषा दर्जा दिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्र शासनाचे आभार मानले. ते म्हणाले, मराठी भाषेचे व्यावसायिक महत्त्व टिकवून ठेवायचे असेल तर मराठी साहित्य, नाटक अशा सर्व माध्यमांना आपण मोठे केले पाहिजे. नव्याने येणाऱ्या साहित्यिकांना मोठे करण्याची जबाबदारी मराठी भाषिकांची आहे. मराठी केवळ ही संवादाची नव्हे तर अर्थाजनाची, रोजगाराची भाषा झाली पाहिजे.  मराठी बोलणारा, ऐकणारा, मराठी कलांचा आदर करणारा मराठी समाज टिकविला, वाढविला पाहिजे. अखिल भारतीय साहित्य परिषदेच्यावतीने या संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री.छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा सन्मान करण्यात आला.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, महाराष्ट्रात हिंदी भाषेची सक्ती अजिबात होणार नाही.  मराठी भाषेचा सन्मान वाढविला जाईल. राज्यातील सर्व एसटी बस स्थानकांच्या आवारांमध्ये मराठी ललित पुस्तकांच्या विक्रीसाठी ५० टक्के सवलतीत स्टॉल उपलब्ध करुन दिले जातील. लेखन आणि प्रकाशन व्यवसायावर लागू असलेला कर कमी करण्यासाठी प्रयत्न केले जातील.  यावेळी त्यांनी ९९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या यशस्वी आयोजनाद्दल आयोजकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.

मराठी भाषा मंत्री श्री. सामंत म्हणाले, सातारा  येथील ९९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाला मराठी भाषा विभागाने ३ कोटी रुपये दिले आहेत. येणारे साहित्य संमेलन हे शंभरावे संमेलन आहे. या निमित्ताने मराठी भाषा विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. यामध्ये येणाऱ्या संमेलनात झालेल्या शंभर संमेलन अध्यक्षांसाठी ग.दि. माडगूळकर यांच्या नावे सन्मान निधी दिला जाईल. शंभराव्या संमेलनापासून संमेलनाचे जे अध्यक्ष असतील त्यांच्यासाठी महादजी शिंदे यांच्या नावे सन्मान निधी दिला जाईल. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे स्मारक सातारा येथे होण्यासाठी सातारा एमआयडीसीतील दीड एकर जमीन देण्यात येईल. स्व. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना त्यांनी महाराष्ट्रात अनुवाद समिती असावी अशी भूमिका घेतली होती. त्याद्वारे ग्रामीण भागातील साहित्य विविध भाषांमध्ये रुपांतरित करुन प्रकाशनासाठी शासन निधी उपलब्ध करुन देईल अशी भूमिका घेतली होती.  याच भूमिकेतून त्यांनी अनुवाद समिती स्थापन केली होती. कालांतराने ती बंद पडली. सातारा येथील साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या नावे अनुवाद समिती पुन्हा सुरु करण्यात येईल. यावेळी त्यांनी साहित्य समितीच्या पदाधिकाऱ्यांना साहित्य संस्थांच्या कामात कोणीही लोकप्रतिनिधी हस्तक्षेप करीत नाहीत. याउलट राज्यकर्त्यांची ताकद साहित्य संमेलनासोबत असली पाहिजे, अशी भूमिका मांडली. साहित्य परिषदेच्या पुणे येथील इमारतीसाठी १ कोटीचा निधी देण्याचे पत्र यावेळी दिले.

यावेळी स्वागताध्यक्ष श्री.छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले, सातारा येथील साहित्य संमेलनात रसिकांना साहित्यिक मेजवानी मिळाली. साहित्य संमेलनातील प्रत्येक कार्यक्रम, ग्रंथ दालन, कवी कट्टा, गझल कट्टा, प्रकाशन कट्टा, ग्रंथ दिंडी, कवी संमेलन, बाल मंच, कथा कथन, मुलाखत, पुस्तक चर्चा, परिसंवाद, हास्य जत्रा, परिचर्चा अशा सर्वंच कार्यक्रमांना रसिकांनी दिलेल्या भरभरुन प्रतिसादामुळे यशाची उंची गाठता आली. या संमेलनाने नवीन पायंडे घालून दिले.  संमेलन यशस्वी करण्यासाठी पाठीशी राहणारे महाराष्ट्र शासन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, साताऱ्यातील उद्योजक, सहकारी संस्था, बँका आणि सर्वसामान्य सातारकर, देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले साहित्यिक, लेखक, प्रकाशक अशा सर्वांचेच त्यांनी मनपूर्वक आभार मानले. मागील चार दिवसात जवळपास आठ लाख मराठी साहित्य रसिकांनी या संमेलनाला भेट दिल्याचे सांगून मंत्री श्री. भोसले म्हणाले, हा साहित्य संमेलनातील रसिकांच्या सहभागाचा उच्चांक ठरु शकतो. महाराष्ट्रात केवळ मराठी भाषेचीच सक्ती असेल या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेल्या भूमिकेचे आपण सर्वांनी स्वागत केले पाहिजे असे सांगून अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे यजमानपद यावर्षी साताऱ्याला मिळावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

संमेलनाचे अध्यक्ष श्री. विश्वास पाटील म्हणाले, हे संमेलन साताऱ्याच्या वैभवात भर टाकणारे असे झाले. श्रीमंत छत्रपती शंभूराज यांच्या हत्येनंतर संभाजी पुत्र शाहू महाराज यांनी केलेला संघर्ष त्यांनी दाखवलेला संयम, त्यांच्या जीवनात महत्त्वाचे प्रसंग त्यांनी उद्धृत केले. शिवाजी महाराजांचे पिता शहाजी महाराज यांची समाधी सुस्थितीत आणण्यासाठी प्रयत्न करण्याचा शब्द उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिला असल्याचेही त्यांनी सांगितले.  मराठी भाषेतील रसग्रहण, अलंकार, विनोद नवीन पिढीला कळावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे. सोशल मीडिया हा सोशल बिघाडीया बनत चाललेला आहे, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. समाजातील संहिष्णुता संपत चालली आहे. हे असहिष्णू वातावरण चिंताजनक आहे असे सांगून मराठी भाषेच्या सांस्कृतिक, अस्तित्वासाठी लढाव्या लागणाऱ्या सर्व लढाया लढू अशी ग्वाही त्यांनी दिली. छत्रपती संभाजीपुत्र छत्रपती शाहू महाराज व छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्यावर मौलिक संशोधन करण्याचा शब्दही त्यांनी दिला.

ज्येष्ठ साहित्यिक श्री. चौधरी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या या भूमीत त्यांच्याप्रति आदर व्यक्त करुन महाराष्ट्र शासन व येथील सर्वसामान्य रसिक मराठी भाषेला देत असलेला आदर पाहून आशावाद व्यक्त केला. महाराष्ट्राची व मराठी भाषेची भरभराट होवो. अशा शुभेच्छाही त्यांनी व्यक्त केल्या.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. श्री. जोशी म्हणाले, हे साहित्य संमेलन साहित्य, वाचक, रसिक केंद्रित झाले. या संमेलनात, सामाजिक, राजकीय अशी सर्वच मुळे खोलवर गेली आहेत. या संमेलनात साहित्य महामंडळाने मराठी भाषेचा कळवळा ठामपणे मांडला आहे. या संमेलनाची स्पंदने दीर्घकाळ रसिकांमध्ये रेंगाळत राहतील. त्यातून अनेक साहित्यिक निर्माण होतील. शंभरावे साहित्य संमेलन पुण्यात होणार असून. पहिले साहित्य संमेलनही पुण्यात झाले होते. या निमित्ताने एक वर्तुळ पूर्ण होईल. शंभराव्या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने दुबईत विशेष साहित्य संमेलन होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

अखिल भारतीय साहित्य परिषदेच्या वतीने या संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री.छ.शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संमेलनाला भरीव मदत करणारे, फरोख कुपर, परांजपे ऑटोकास्टचे श्री. ऋषीराज यांच्यासह जिल्हाधिकारी श्री. पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नागराजन, पोलीस अधीक्षक श्री. दोशी, नगर प्रशासन अधिकारी श्री. बापट, डॉ. राजेंद्र सरकाळे, राजेंद्र लाखे, पद्माकर कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

साहित्य संमेलन समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, सूत्रसंचालन स्नेहल दामले व साहित्य संमेलनात सुनिताराजे पवार यांनी विविध ठराव मांडले.





## जात्यावरच्या ओव्या......

माय रुक्मिणी
सांगते पांडुरंगा
आली लेकर भेटाया
लई दूरवर रांगा ||४३३||

देवा बघून रे तुला ||४३४||
डोळे माझे पाणावले
भटकल्या पाडसाला
मायबाप गवसले ||४३५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## ज्ञानतपस्वी आबासाहेब अमृतकार




ज्योतिर्मय साहित्य

आपल्या सहकारी शिक्षकांचे कौतुक करणे, त्यांना प्रोत्साहन देणे यासारख्या गोष्टी ते सहज करत असत. एखादा नवीन लागलेला शिक्षक व्यासपीठावर एखाद्या विषयावर बोलायला आला तर त्याचे हमखास कौतुक आबासाहेबांकडून व्हायचेच. अशा शिक्षकाच्या बोलण्यात काही चुका असल्यास किंवा त्याला काही मार्गदर्शन करायचे असले तर तेही आबासाहेब आवर्जून करीत. परंतु ते सर्वांसमोर कधीच नाही. तर त्या व्यक्तीला ते आपल्या केबिनमध्ये बोलावून घेत, त्याला प्रेमाने बसायला सांगत बऱ्याचदा त्याच्यासाठी चहा देखील मागवत आणि मग बोलता बोलता सहजपणे त्याला मार्गदर्शन करीत अशी त्यांची समजावून सांगण्याची पद्धत होती. मुख्याध्यापक किंवा अन्य अधिकाऱ्यांनी एखाद्या शिक्षकाला बोलावले असेल तर आपले काही चुकले का अशी भीती त्याला वाटत असे. परंतु आबासाहेबांनी बोलावले असले तर अशी भीती कोणाला कधीच वाटली नाही. एखाद्या शिक्षकाला आपली काही अडचण किंवा समस्या विचारायची असेल, मार्गदर्शन हवे असेल तर त्यासाठी हक्काचे ठिकाण म्हणजे आबासाहेब अमृतकार सर !

शिक्षकांसाठी डीएड आणि बीएड अशी दोन प्रकारची प्रशिक्षणे असतात. परंतु त्यातून खरा शिक्षक घडतोच असे नाही.




खरा शिक्षक हा अनुभवातून घडत जातो आणि अशा नवीन शिक्षकांना घडवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका असायची ती आबासाहेबांची ! नवीन शिक्षकांना विविध प्रकारे प्रोत्साहन देऊन, समजावून सांगून, कधी कधी त्यांच्यासमोर स्वतः पाठ घेऊन त्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले आहे.

सेवाकाळात शासनाच्या आणि शिक्षणखात्याच्या वतीने शिक्षकांसाठी विविध प्रकारची प्रशिक्षणे आयोजित केली जात असत. अशा प्रशिक्षणांमध्ये आबासाहेब नियमितपणे तज्ञ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन करीत असत. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ विविध अनुभवी, अननुभवी शिक्षक, मुख्याध्यापक आदींना होई. शिक्षणात आलेले नवनवीन विचारप्रवाह, पद्धती यांचा स्वीकार करून विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे कसे शिकवता येईल याचाच विचार त्यांच्या डोक्यात नेहमी असायचा. **(क्रमशः)**









उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## ब्रम्हनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

परमार्थ साधना करत असताना ''मी''या शब्दाला खूपच महत्व आहे. परमेश्वराला ''मी''पणा आवडत नाही. मग मला सांगा मित्रांनो संसारात राहून सर्व कर्म करत राहूनजर तुम्ही परमार्थ करत असाल तर तुम्ही परमात्म्याशी एकरूप आहात हेच सिध्द होते. ''मी खरा कोण आहे''हे न कळणं म्हणजे अज्ञान होय. ते अज्ञान नाहीसे झाले की परब्रम्ह सहज भेटतो. व्यवहारी जगातील देहबुध्दीतील मोठेपणाला ब्रम्ह स्वरूपाच्य ठिकाणी काही किंमत नसते. कारण देहबुध्दीतील अहंभाव टाकून द्यायचा आहे.व आपल्याला जे परमात्म्याशी एकरूप व्हायला हवे. ब्रम्हस्वरूपाच्या जवळ ऊंच्नीच असाभेदभाव नसतो.देवाला सगळी लेकरं सारखेच असतात.राजाला ऊत्तम ब्रम्ह व त्याच्या नौकरांना हलके ब्रम्ह असा फलक ब्रम्ह कधीही करत नाही.समर्थाचे तत्वज्ञान हे व्यापक,भेदरहित सूक्ष्म आणि अतिमानवी आहे. मानवी जीवन हे भेदाने भरलेले आहे.स्वस्वरूपानुभव अभेदाने भरलेले असते.यासर्वाची सांगड घालण्यासाठी ''दासबोध ''वाचलाच पाहिजे।

सदुरुला जे ब्रम्हपद मिळते ते प्रत्येक शिष्याला पण प्राप्त होते.''श्रुतीचे वचन आहे की''ब्रम्ह एकच एक असे अद्वितीय आहे.

ब्रम्ह कसे आहे?

ब्रम्ह नवेजूने असे नाही. त्याला कालभेद मान्य नाही. ''मी देह आहे'' ही भावना असणे म्हणजे देहबुद्धी होय.

''मी आत्माच आहे'' अशी बुद्धी होणे म्हणजे आत्मबुध्दी होय. देहबुध्दी हेअज्ञानाचे प्रधान लक्षण आहे तर आत्मबुध्दी हे आत्मज्ञानाचे प्रधान लक्षण आहे.देहबुध्दीतील जोरावर जीव आकुंचित होऊन द्रुष्याच्या नादी लागतो. तर आत्मबुध्दीच्या प्रकाशाने जीव खूप मोठा होऊन ब्रम्ह स्वरूपाशी, समरस होऊन जातो.माणसाची देहबुद्धी जुनाट आहे.ती सुटता सुटत नाही इतकेच नाही तर ती आत्मबुध्दी निर्माण होण्यासपरत परत आड येते. म्हणून माणसाने देहबुद्धी सोडावी.भगवंत आणि संत यांच्या पर्यन्त पोहचायचे आहे तर देहत्वाचे मीपण सोडले पाहिजे.

आपण ३५ व्या ओवीपर्यन्त आलो होतो. संपूर्ण देहाला पूरून उरते ती देहबुद्धी होय. आयुष्य आहे तोपर्यंत मी हे केले मीते केलं मी अमुक करणार असं न संपणार संसाराचा गाडा पुढे ढकलत न न्यायचा असतो तो ही आनंदाने सत्कर्म करत सत्कारणी लावायचा असतो. **(क्रमशः)**

## तुम्ही नाम घ्यायला लागा, भगवंताचे प्रेम येईलच.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**माणसाला आपला स्वार्थ साधायचा नाही, त्याला कमी पडणे शक्यच नाही. जिथे नि:स्वार्थीपणा आहे तिथे भगवंताला पुरवठा केलाच पाहिजे. आपण जगावर प्रेम केल्याशिवाय परत प्रेम मिळणार नाही. जो भगवंताच्या प्रेमात तल्लीन झाला, त्याला बाकीच्या गोष्टींची आठवण राहात नाही. ज्याप्रमाणे मालक घरात आला की चोर पळालाच म्हणून समजा, त्याचप्रमाणे जो भगवंताच्या प्रेमात रमला, तो खात्रीने सुखी बनला; कारण त्याची देहबुद्धी पळून जाते. म्हणून भगवंताला अशा प्रेमाने आळवावे, की त्याच्या डोळ्यांत पाणी यावे. आळवताना आपल्या डोळ्यांत पाणी आले की भगवंताच्या डोळ्यांत पाणी येते.

भगवंताचे प्रेम लागायला सत्संगतीचा मार्ग अतिशय उत्तम आहे यात शंकाच नाही. परंतु सत्संगती सर्वांनाच मिळेल असे काही निश्चयाने सांगता येणार नाही. दुसरा मार्ग विचाराचा आहे. नेहमी चांगले आणि पवित्र विचार मनात बाळगावेत. भगवंताने सर्वांवर कृपा करावी, त्याने सर्वांचे कल्याण करावे, त्याचे प्रेम सर्वांना यावे, असे विचार नेहमी मनात ठेवून संतांच्या विचारांचे मनन करावे. सर्वांचे कल्याण चिंतण्यात स्वत:चे कल्याण अनायासे होत असते. पण आपण असे पाहातो की, आपले विचारसुद्धा नेहमी स्थिर राहात नाहीत. नामस्मरणाला बसल्यानंतरसुद्धा किती अपवित्र विचार आपल्या मनात येत असतात, याचा सर्वांना अनुभव आहे ना ? तेव्हा चांगले विचार मनात बाळगणे हेही आपल्या हातात नाही. आता तिसरा मार्ग म्हणजे नाम. नाम हे एकच साधन असे आहे की, आपल्याला ते प्रयत्नाने घेता येईल. ते नाम तुम्ही सर्वांनी नि:शंकपणे घ्या. त्या नामाच्या विरुद्ध तुम्हाला कुणीही काहीही सांगितले तरी त्याचे ऐकू नका. ते नाम कसे घ्यावे वगैरे चिकित्सेत तुम्ही पडू नका. तुम्ही नाम घ्यायला लागा, भगवंताचे प्रेम तुम्हाला आल्याशिवाय रहाणार नाही. अगदी सतत निश्चयाने नाम घ्या. जिथे नाम तिथे माझा राम आहे, हा माझा विश्वास तुम्ही बाळगा. दुसरे काही एक न करता सतत निश्चयाने नामात राहाणाऱ्या माणसाला संतांची भेट होऊन ते त्याचे कल्याण करतील. भगवंताचे नाम ही ठिणगी आहे. ती फुलवली तर सबंध जग भरून जाईल एवढी मोठी होऊ शकते. ही नामाची ठिणगी आपण सतत जागृत ठेवू या. जो नामात राहिला त्याचा वासनाक्षय झाला आणि दैन्यपणा संपला. ते नाम तुम्ही सर्वांनी मनापासून घ्या, आणि सर्वांनी अगदी आनंदात राहून सुखाने संसार करा.

विचार आणि नाम यांनी वासनेला खात्रीने जिंकता येईल. मग आपले कर्तेपण आपोआप मरून जाईल.

***

## ॥ अभंग-माधव ॥



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



◆श्रीकृष्णाला उद्देशून◆

तूच माझा बंधू। तूच माझा सखा।
देशी मज सुखा। निरंतर ॥१॥
केलेस रक्षण। पांडवांचे सदा।
शस्त्र न धरता। रणांगणी ॥२॥
कुरुक्षेत्रावरी। संभ्रमित पार्था।
कथिलिस गीता। रथावरी ॥३॥
द्रौपदीच्या केले। शीलाचे रक्षण।
दृष्ट निर्दालन। नित्य केले ॥४॥
आता कलियुगी। पापे झाली फार।
आम्हा लागे घोर। भविष्याचा ॥५॥
माधव हा म्हणे। आता हे केशवा।
अवतार घ्यावा। कलियुगी ॥६॥



## श्री संत ज्ञानेश्वर

*अभंग व अर्थ*

*अभंग १*

*रुप पाहतां लोचनीं ।*
*सुख जालें वो साजणी ॥१॥*
*तो हा विठ्ठल बरवा ।*
*तो हा माधव बरवा ॥ध्रु०॥*
*बहुता सकृतांची जोडी ।*
*म्हणुनि विठ्ठलीं आवडी ॥२॥*
*सर्व सुखाचें आगरु ।*
*बापरखुमादेविवरु ॥३॥*

*अर्थ:-*

*ज्ञानेश्वर माऊली हे मनरुपी सखी त्या माझ्या इष्टदेवतेचे रुप मी पाहिले व मला सुख प्राप्त झाले. तो देव कोणी त्याला विठ्ठल म्हणते तर कोणी त्याला माधव म्हणते. माझा गतजन्माच्या सकृतामुळे तो देव विठ्ठल मला आवडायला लागला. असा तो सर्व सुखाचे भांडार असलेला तो मला माझे आईवडिलांमुळे प्राप्त झाला असे माऊली म्हणतात*




## घाम येण्याचे फायदे

ज्योतिर्मय साहित्य

उन्हाळा आणि घाम हे ठरलेलं समीकरण आहे. उन्हाळयात घाम येणे ही सर्वात मोठी समस्यां असते. घाम येऊ नये म्हणून अनेक उपाय केले जातात. एसी हा तर आजकाल वापरला जाणारा सर्वात महागडा पर्याय आहे, परंतु घामापुढे एसीची काय किंमत. गाडी, घर, ऑफिस आजकाल सर्वत्र एसी लावले जातात. घामापासून वाचण्यासाठी एसी, फॅन यांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. परंतु आपण कधी विचार केला आहे का की, घाम का येतो ? घाम येण्याचे फायदे काय आहेत? आज आपण घाम येण्याचे फायदे पाहणार आहेत. हे फायदे वाचून तुम्ही थक्क व्हाल. उन्हाळ्यात घाम येणे एक सामान्य गोष्ट आहे, त्यामुळे तुम्हाला घाम येणे गरजेचे आहे. घाम येणे हे कोणत्या रोगांचे लक्षण नसून घाम येणे हे एक चांगल्या आरोग्याचे लक्षण आहे. पण प्रमाणाबाहेर जर घाम येत असेल तर मात्र योग्य वेळी डॉक्टरचा सल्ला घेणे गरजेचे आहे. घाम आल्यामुळे आपल्या शरीरास त्यांचे खूप फायदे होतात. घाम आल्यामुळे आपले शरीर स्वछ होते. आपल्या शरीरातील हानीकरक गोष्टी शरीरा बाहेर टाकल्या जातात.

घाम येणे ही शरीराची नैसर्गिक प्रक्रिया आहे. शरीराचे तापमान नियंत्रित करण्यासाठी शरीर या प्रक्रियेचा वापर करते. या प्रक्रियेद्वारे शरीरातील विविध रसायने आणि हार्मोन्स यांचे संतुलन कायम ठेवले जाते. मात्र, अधिक घाम येणे हे आरोग्य ठीक नसल्याचे निर्दशक मानले जाते शरीरातून घाम आलाच पाहिजे. घाम ही शरीराचे संरक्षण करणारी नैसर्गिक पद्धती आहे. घाम येण्यामुळे शरीर थंड राहते. शरीराचे उष्णतेपासून संरक्षण होते. तसेच वेगवेगळ्या संसर्गांपासून शरीराचा बचाव होतो. जेव्हा घाम येत नाही तेव्हा ब्लड प्रेशर वाढते या बरोबरच ताप देखील येतो.

वजन कमी करण्यासाठी घाम जरुरी. सध्याच्या काळात वाढते वजन ही फार मोठी शाररिक समस्या आहे. वजन वाढल्यामुळे अनेक शाररीक व्याधी सुरु होतात. त्यामुळे आजकाल वजन कमी करण्यासाठी कित्येक तास जिममध्ये वर्क आऊट केले जाते. वर्क आऊट करून वजन कमी केले जाते. जेव्हा वर्क करतो तेव्हा भरपूर घाम येतो तेव्हा शरीरातील कॅलरी मोठ्या प्रमाणत बर्न होतात व त्यामुळे वजन कमी होते. जेव्हा -जेव्हा शरीरातील कॅलरी बर्न होतात तेव्हा त्या घामावाटे बाहेर टाकल्या जातात.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

डिटॉक्स– नियमित घामामुळे शरीरातील हानिकारक द्रव्य पदार्थ बाहेर टाकले जातात. जेव्हा आपले शरीर डिटॉक्स होते तेव्हा आपल्या शरीरातील डेड म्हणजेच मृत पेशी बाहेर टाकल्या जातात. त्वचेला एक वेगळाच निखार येतो.

बैलेंसिंग टेंपरेचर : म्हणजेच तापमान नियंत्रण घामामुळे आपल्या शरीरातील तापमानाची पातळी राखली जाते. उन्हाळ्याच्या दिवसांत शरीराचे तापमान सतत बदलले जाते. ज्यामुळे आपल्याला कधी–कधी खूप अस्वस्थ वाटते. घाम येण्यामुळे शरीर थंड राहते. शरीराचे उष्णतेपासून संरक्षण होते. तसेच वेगवेगळ्या संसर्गांपासून शरीराचा बचाव होतो. शरीर गरम झाल्यावर शरीरातून घाम येतो. घामामध्ये अँटी मायक्रोबियल पेप्टाथाईड नावाचा पदार्थ असतो. हा पदार्थ क्षयरोगासारख्या असाध्य व्याधीशी लढताना उपयोगी ठरतो.

त्यामुळे शरीरशुद्धीसाठी हिवाळ्यात सुद्धा घाम येईल असा व्यायाम करणे आवश्यक आहे.

***



## लघु बोधकथा

***◆ घुबड आणि टोळ◆***

***एक म्हातारे घुबड झाडाच्या ढोलीत झोपले असता एका टोळाने झाडाखाली गाणे म्हणायला सुरुवात केली. त्याने गाणे म्हणू नये म्हणून घुबडाने त्याला विनंती केली, बाबा रे, तू येथून जा, मला विनाकारण त्रास देऊ नकोस. तुझ्या किरकीरीने माझी झोप मोडते. यावर तो टोळ त्या घुबडाचा धिक्कार करून त्याला शिव्या देऊ लागला. तो म्हणाला, तू लबाड, चोर आहेस, रात्रीचा बाहेर जाऊन चोरी करून पोट भरतोस नि दिवसा झाडाच्या ढोलीत लपून बसतोस. त्यावर घुबड म्हणाले, अरे तू आता आपलं तोंड सांभाळ, नाहीतर मग पस्तावशील. तरीही टोळ ऐकून घेईना. घुबडाची निंदा करून तो पुन्हा गाऊ लागला, मग घुबडाने त्याची खोटी स्तुती करायला सुरुवात केली, बाबा रे, क्षमा कर. तुझं गायन अगदी गोड आहे. माझ्या इतका वेळ ते लक्षात आलं नाही. तुझ्यासारखा गाणारा तूच. तुझ्या गाण्यापुढे कोकीळाही लाजेल. तुझा स्वर सारंगीपेक्षा चांगला आहे. बरी आठवण झाली. माझ्याकडे एक अमृताची कुपी आहे. त्यातले थोडेसं मी तुला देतो. फार वेळ गात राहिल्याने तुझा गळा अगदी सुकून गेला असेल नाही का? टोळाला खरोखरच तहान लागली होती, तो घुबडाजवळचे अमृत घेण्यासाठी त्याच्याजवळ गेला. लगेच घुबडाने त्याला उचलून आपल्या तोंडात टाकले.***

***तात्पर्य***

***- आपल्याला जे आवडते ते सर्वांनाच आवडेल असे नाही, हे लक्षात घेऊन दुसऱ्याच्या आवडीनिवडीचा जे विचार करीत नाहीत ते शेवटी आपला नाश करून घेतात.***

# मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाच्या अधिवेशनात विविध १२ ठराव संमत

**छत्रपती संभाजीनगर –** पैठणमध्ये सोमवारी, ५ जानेवारी २०२६ रोजी बाहेरील नाथ मंदिर परिसरातील कीर्तन हॉलमध्ये मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ व संभाजीनगर जिल्हा ग्रंथालयाच्या वतीने ४७ वे अधिवेशन उत्साहात पार पडले. यावेळी विविध १२ ठराव संमत करण्यात आले.



अधिवेशनाच्या समारोपप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून पाचोडचे सरपंच शिवराज भुमरे, पैठणच्या नगराध्यक्ष विद्या कावसानकर, राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. प्रा. रामेश्वर पवार, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राज शेखर बालेकर, ज्येष्ठ साहित्यिक विलास वैद्य आदी उपस्थित होते.

शासनमान्य ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ झाली पाहिजे. शासनमान्य ग्रंथालयांचा दर्जा व वर्गात बदल करणे, आर. आर. लायब्ररी फाउंडेशनचे प्रस्ताव एकदा दिल्यानंतर फक्त त्रुटी दूर करून स्वीकारणे, वाचनालयंना जिल्हा नियोजन व विकास योजनेतून संगणक संच व फर्निचर देण्यात यावे, कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळावे, दर पाच वर्षांनी स्वत:ची इमारत असलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांना रंग रूमसाठी पाच वर्षातून एकदा विशेष अनुदान द्यावे, बाह्य यंत्रणेद्वारे शासन नेमणूक करून कामे (डेटा एन्ट्री) करतात, त्याप्रमाणे सार्वजनिक ग्रंथालयात डेटा एन्ट्रीसाठी होणारा खर्च शासनाने वेतनात न सामावता इतर खर्चात ग्राह्य धारावे. पैठण येथील संत पीठ पूर्णक्षमतेने चालविण्यासाठी शासनाने आवश्यक तेवढा निधी तत्काळ उपलब्ध करून द्यावा.

राज्यातील बंद पडलेली सर्वच्या सर्व ग्रंथालय शासनाने कालमर्यादेत सुरू करण्याची कारवाई करावी. सर्व शाळा महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना दररोज वर्तमानपत्रे वाचण्यासाठी उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित व्यवस्थापनाने दक्षता घ्यावी. नियमित वर्तमानपत्र वाचणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रत्येक वर्षी (बाळकृष्ण शास्त्री जांभेकर) दर्पणदिनी सत्कार करावा आदी ठराव अधिवेशनात सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

ग्रंथांवर पुष्पवृष्टी

मान्यवरांच्या हस्ते तुकाराम गाथा, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, भारतीय संविधान व जयवंत पाटील लिखित प्रतिष्ठान आदी ग्रंथांवर पुष्पवृष्टी करून अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी डॉ. गजानन कोटेवार, प्रास्ताविक गुलाब मगर, राम मेकेले, समर्थ भिसे यांनी केले. या वेळी उत्कृष्ट ग्रंथालयांना देवगिरी सहकारी बँकेतर्फे व कॉ. चंद्रगुप्त चौधरी, मराठवाडा कामगार ग्रंथालय तर्फे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी दिनेश पारिक, विष्णु बोडखे, रमेश सोळुंके, जगन्नाथ सोळुंके, संदीप बोरुडे, सुनील वायाळ, सुभाष सोळंके, बी. बी. देशपांडे, जीवन लोखंडे, व. ग सूर्यवंशी, प्रभाकर कापसे, संतोष ससे, अरविंद लंके, राजेंद्र हंबिरे, राजेंद्र सानप, देविदास जिगे, युवराज जाधव, नरहरी मंठेकर, गिरधारी कदम आदींनी परिश्रम घेतले.

भव्य ग्रंथ दिंडी

याप्रसंगी नाना महाराज काकडे व सुधाकर महाराज वाघ यांच्या नेतृत्वाखाली पैठण शहरातून भव्य ग्रंथदिंडी काढण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. जालिंदर येवले यांनी, तर आभार प्रदर्शन गुलाबराव मगर यांनी केले.

# लोकशिक्षक साने गुरुजी

**ज्योतिर्मय साहित्य**

।। करी मनोरंजन जो मुलांचे जमेल नाते प्रभुशी तयांचें ।।



ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरी लिहून मराठी भाषा पसायदानाच्या माध्यमातून विश्वात रूजवली व सर्व विश्व देवमय केले. मराठी साहित्य अमृतमय केले. रसाळ ग्रंथसंपदा निर्माण करून विश्व शांतीचा संदेश घराघरात पोहचवला. त्याचं प्रमाणे साने गुरुजींनी शामची आई हे पुस्तक लिहून मातृप्रेमाची अभिनव गीता समस्त साहित्य विश्वात खोलवर रूजवली. शामची आई हे पुस्तक मातृप्रेमाची जेवढी महती सांगते, तेवढेच ते शिक्षण, शिक्षणाचे तत्वज्ञान, विद्यार्थी, शिक्षक, अध्ययन, अध्यापन आणि सर्वोत्कृष्ट लेखन याविषयी आदर्शवत माहिती देते. माणसाच्या मनाचा मोठेपणा त्याच्या आई बापावर अवलंबून असतो. कारण आईच्या वागण्या बोलण्यात असलेले बारकावे बालक लगेच आत्मसात करते. म्हणून आई हा मुलांचा पहिला गुरू असतो. या गुरूकडून मिळणारे शिक्षणाने मुलाच्या भावी जीवनातील ब-यावाईटाचा पाया घातला जातो. आपला मुलगा किर्तीवंत व्हावा,भाग्यवंत, यशवंत, पुण्यवंत, शीलवंत व्हायला हवा असे प्रत्येक आईला वाटत असते. ओल्या मडक्याला आकार देण्यासाठी कुंभार जसा प्रयत्न करतो तशीचं प्रत्येक आई सतत धडपडत असते.

मित्रांनो साने गुरुजींनी आपल्या जडणघडणीत आईचा वाटा किती मोठा आहे हे पटवून दिले आहे.

मुलांचे शिक्षण हे मातेवर, पित्यावर, आप्तेष्टांवर, सभोवतालच्या परिसरातील वातावरणावर, सर्व सजीव निर्जीव सृष्टीच्या प्रत्येक घटकावर अवलंबून असते. म्हणून मुलांसमोर फार जपून वागावे. घरातील वातावरण पवित्र स्वच्छ राखावे. जसे सुर्य चंद्राच्या किरणांनी कमळे फ ुलतात तसेच आई बापाची कृत्ये स्वच्छ, सतेज, तमोहीन असावीत.

शामला आईने शिकवले व तशीच त्यांची जडणघडण होत गेली. शाळेत शिक्षक शिकवतात. हे जसे खरे पण घरात मुलांची मस्तके फुलवली जातात आई ती फुलवते. शाळेतले शिक्षण हे पुस्तक प्रधान असते तर घरातले शिक्षण हे मस्तक प्रधान असते. आपल्या श्यामच्या मस्तकात ख-याखु-या शिक्षणाची खाण त्याच्या आईनेच निर्माण केली. सदाचार हा शिक्षणाचा अलंकार आहे हे आई शिकवते. जग हे उघडे पुस्तक आहे.त्यात चित्रविचित्र चित्रे आहेत. मोहक ठिकाणं आहेत. वाहून जाण्यासाठी ओढे नाले आहेत. आणि पडण्यासाठी घसरगुंडी पण आहे. म्हणून या जगात आपण नेहमी स्वतःला जपावे. सतत सावध रहावे.



सौ उज्वला धर्माधिकारी
पुणे. 75882 35646

मी लेखाच्या सुरवातीला म्हणाले आहे की पसायदान व साने गुरुजींच्या आईने दिलेली शिकवण दोन्ही धडे कायम लक्षात ठेवण्या सारखी आहेत.

विश्वाचा विशाल ग्रंथ वाचावा, मनुष्याच्या जीवनात अनेक सुखदुःखाची माहिती मिळवावी, उपदेशापेक्षा उदाहरणातून मिळणारे शिक्षण जास्त परिणामकारक असते. श्रमात आत्मोध्दार आहे. स्वावलंबी शिक्षण हे माणसाच्या बुध्दीला विवेकाचे स्वरूप प्रदान करते. स्वावलंबनाने जगात ताठ मानेने जगता येते तर परावलंबनाने समोरच्या पुढे सतत मान झुकवून चालावे लागते. श्रम केल्या शिवाय काही देऊ नये व घेऊही नये. फुकट देण्यात आणि घेण्यात पतन आहे. विचार निर्माण करा,धान्य निर्माण करा, जे जे उत्तम उदात्त उन्नत महन्मंगल, स्वहीत व समाजहीत साधणारे आहे. ज्या ज्या गोष्टीत आनंद आहे ते ते निर्माण करा. तो तर आपल्याला जगण्याचा अधिकार आहे.

ज्या ठिकाणी समाजसंवर्धक, समाज रक्षक, समाज पोषक वातावरण निर्माण केले जाते, श्रमाची पूजा केली जाते ते ते घर, सभोवतालचा परिसर,व राष्ट्र वैभवाच्या शिखरावर जाऊन पोहोचते.

शिक्षणाने माणूस परिपूर्ण होतो पण ते शिक्षण सौंदर्य, सहनशीलता, सत्वशीलता, सहानुभूतीने विचार करणारे, सदाचाराचा आग्रह धरणारे, सद्गुणांचे, स्वच्छता पाळणारे मग ती शरिराची व मनाची असो ह्याची नितांतसुंदरता असली पाहिजे.

सद्गुणांचा विचार न करता सदाचारी वृत्तीला तिलांजली देत जर शिक्षणाचा विस्तार वापर करत असाल तर ते शिक्षण व्यर्थ होय. ते फक्त पोटभरीचे शिक्षण झाले. मी शिकलो मी कमावतो मी वैभवात रहातो हे आपमतलबी शिक्षण फक्त स्वतःचा विकास करते पण समुहाचा राष्ट्रीय सेवावृत्तीचा विचार करणारे शिक्षण राष्ट्राची उंची वाढवतात. शिक्षणाने आपली उंची तर वाढवली पाहिजे पण राष्ट्रीय हिताला सतत महत्व देणारे हात निर्माण झाले पाहिजेत. आपल्या घरात सभोवताली गावात गावकुसाबाहेर जे जे समाजविघातक कृत्यं होतात त्यांना समुहाने उत्तरं द्यायला हवी. राष्ट्रीयहिताला जास्त जपणारे लोकशिक्षण घराघरात पोहोचले पाहिजे.

राष्ट्रप्रेमाची ज्योत ज्या ज्या देशात तेवत ठेवली जाईल ते ते देश कुठल्याही संकटांना सामोरे जाण्यासाठी सदैव तत्पर असतील. मुळात सेवा हा शब्द अतिशय पवित्र आहे. सेवा घरातील ज्येष्ठांची करावी आजूबाजूला असलेल्या लाखोंच्या संख्येने उपेक्षितांची करावी, सेवाभाव हा कायम मनात ठेवावा. आपल्याला जे जे ज्ञान मिळाले आहे ते ते ज्ञान सेवाभाव जागृत करून दुसऱ्यास देत जावे. सेवावृत्तीचे तिर्थ सर्वांना वाटत असताना ते पाझरत पाझरत लोक कल्याणार्थ पोहचले पाहिजे. सेवा ही ईश्वरचरणी वाहिलेली पूजा आहे. स्वहिताचा विचार न करता केलेली सेवा परमात्म्याच्या ठिकाणी रूजू होते पण स्वार्थाने केलेली पूजा फक्त आपलं पोट भरण्यासाठी होते. मग विचार करा आपण फक्त आपलं पोट भरण्यासाठी आप्पलपोटे व्हायचे का?

आपल्यातली अर्धी भाकरी समोरच्या देऊन त्याच्या चेहऱ्यावरील आनंद पहायच !

समोरच्या व्यक्तीच्या मनाची पोटाची तृप्ती पहाण्याएवढा मनाचा मोठेपणा शिक्षणाने तुमच्यात येऊ द्या हे खरे लोककल्याणकारी शिक्षण होय.

शिक्षणातून आचारविचारवंत निर्माण झाले तर ते राष्ट्रीय सेवावृत्तीची भावना जोपासतील. आचाराशिवाय विचारांना सामर्थ्य मिळत नाही. आचारविचार डोळस हवेत . आचारामुळे विचारांना महत्व प्राप्त होते जर तुमचे आचार हे मतलबी,ढोंगी असतील आणि विचारांचा नुसता डोंगर उभा करत असाल तर त्याला काडीचीही किंमत नसते. नुसत्या बोलघेवडे पणाला काय किंमत असणार हो !

म्हणून म्हणते की आचारामूळे विचारांना महत्व आहे.

आधी करावे मग सांगावे.

ज्या ज्या गोष्टीत विकास आहे आनंद आहे, मंगल भावना आहे.जे जे भूषणावह आहे, समतत्वभाव आहे ते ते व्यक्तीचे जीवन परिपूर्ण होण्यासाठी भूषणावह आहे.

सतत समर्थ आचरणातून हे नसानसात भिनले पाहिजे.

कल्पना करा संस्काराची शिदोरी बांधून घेतली भूक लागली आपण थोडी खाल्ली आपल्या आजूबाजूला वाटली जाणारायेणारा पांथस्थाला थोडी दिली तर आपल्या आयुष्यात सदैव शिदोरी भरलेलींचं राहिलं ती कधीच रिती (कमी) होणार नाही यावर विश्वास ठेवावा.

# ‘रुबाब’च्या निमित्ताने शेखर बापू रणखांबे यांचे दिग्दर्शनात रुबाबात पदार्पण !

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी चित्रपटसृष्टीत नव्या विषयांसोबतच नवे, ताकदीचे दिग्दर्शकही आपला ठसा उमटवत आहेत आणि आता या यादीत शेखर बापू रणखांबे यांचे नाव जोडले जात आहे. झी स्टुडिओज प्रस्तुत व झणकर फिल्म्स निर्मित ‘रुबाब’ या चित्रपटाची पहिली झलक काही दिवसांपूर्वीच प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. चित्रपटाच्या धडाकेबाज टीझरनंतर प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाची चर्चा रंगली आहे. दिग्दर्शक शेखर बापू रणखांबे प्रेक्षकांसाठी रुबाबदार लव्हस्टोरी घेऊन येत आहेत. हा त्यांचा पहिला चित्रपट असून टीझरलाच प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे.



मुंबईत संघर्षाची वाट चालत शेखर बापू रणखांबे यांनी आपल्या करिअरची सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात त्यांनी प्लंबिंगसारखी कामे केली. त्यानंतर त्यांचे रंगभूमीशी नाते जुळले आणि नाटकांच्या बॅकस्टेजवर काम करताना कथाकथनाची, अभिनयाची आणि दिग्दर्शनाची शिस्त त्यांनी जवळून अनुभवली. त्यानंतर त्यांनी दिग्दर्शन आणि लेखनाकडे कल वळवला. त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करून अनुभव मिळवला व ‘रेखा’, ‘पॅम्पलेट’सारख्या शॉर्ट फिल्म्स केल्या. पॅम्पलेट या शॉर्ट फिल्मची निवड ‘इंटरनॅशन फिल्म फेस्टिवल’मध्ये इंडियन पॅनोरमा सेक्शन या विभागात झाली. तसेच ‘इंटरनॅशन डॉक्युमेंट्री व शॉर्ट फिल्म फेस्टिवल ऑफ केरला’ मध्ये या शॉर्ट फिल्मला पुरस्कार मिळाला. त्यांच्या ‘रेखा’ या शॉर्ट फिल्मला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला असून चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध दिग्दर्शक रवी जाधव यांनी या शॉर्ट फिल्मची निर्मिती केली होती. याही शॉर्ट फिल्मची निवड ‘इंटरनॅशन फिल्म फेस्टिवल’ च्या इंडियन पॅनोरमा सेक्शन विभागात झाली होती.

शेखर बापू रणखांबे यांची इच्छा चित्रपट करण्याची होती आणि ‘रुबाब’च्या निमित्ताने ही कथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे. गावाकडची प्रेमकहाणी हा विषय परिचित असला तरी, ‘रुबाब’ची मांडणी व दृष्टिकोन अगदी वेगळा आहे. या चित्रपटाची कथा केवळ प्रेमाभोवती फिरणारी नसून, प्रेम जपताना असलेला स्वाभिमान, ठामपणा आणि आत्मविश्वास यावर भर देणारी आहे.




दिग्दर्शक शेखर बापू रणखांबे म्हणतात, “ ‘रुबाब’ हा चित्रपट माझ्या जवळचा आहे. कारण, हा माझा पहिला चित्रपट आहे. मी झी स्टुडियोज व निर्माते संजय झणकर यांचे मनापासून आभार मानतो त्यांच्यामुळे मला योग्य दिशा आणि व्यासपीठ मिळाले. तसेच चित्रपटातील कलाकारांनीदेखील उत्तम कामगिरी करून या कथेला न्याय दिला आहे. ‘रुबाब’ ही केवळ लव्हस्टोरी नसून त्यात एक वेगळेपणा आहे. टीझरला मिळणार प्रतिसाद बघून आनंद होतो. प्रेक्षकांना हा चित्रपट नक्की आवडेल याची मला खात्री आहे.”

संभाजी ससाणे आणि शीतल पाटील या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहेत. झी स्टुडिओज प्रस्तुत आणि झणकर फिल्म्स निर्मित ‘रुबाब’ या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन शेखर बापू रणखांबे यांनी केले असून संजय झणकर आणि गौरी झणकर निर्माते आहेत तर उमेश कुमार बन्सल आणि बवेश जानवलेकर प्रस्तुतकर्ता आहेत. या चित्रपटात संभाजी ससाणे व शितल पाटील प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. येत्या ६ फेब्रुवारीपासून हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.












# पत्रकारिता-व्रत आणि व्यवसाय

**ज्योतिर्मय साहित्य**

समाज सुधारला तरच राजकीय स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त होईल असे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे मत होते. सार्वजनिक जीवनात विचारमंथन करण्यासाठी वर्तमानपत्रासारखी मोठी शक्ति आहे. तिचा उपयोग समाज बदलासाठी होऊ शकतो, याचा बाळशास्त्री जांभेकरांना अभ्यास होता. म्हणूनच त्यांनी दर्पणला समाज परिवर्तनाचे शास्त्र व शस्त्र म्हणून वापरले. जांभेकरांनी मुंबई येथे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण या इंग्रजी आणि मराठी भाषेतील पाक्षिकाची सुरूवात करून मराठी वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रोवली. ६ जानेवारी १८३२ रोजी आपल्या विसाव्या वाढदिवशी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र काढले. या निमित्त राज्यात ६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो.

मराठीतील पहिले संपादक होण्याचा बहुमान मिळविला. त्यांची आठवण म्हणून आपण ६ जानेवारी रोजी महाराष्ट्रात ''दर्पण दिन'' साजरा करतो.

बाळशास्त्रीं जांभेकर यांचा जन्म ६ जानेवारी १८१२ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोंभुर्ले येथे झाला आहे.. मृत्यू १७ मे १८४६ रोजी झाला. (तीन/चार वर्षांपुर्वी महाराष्ट्र सरकारने बाळशास्त्री जांभेकर यांचा राज्यातील महत्वाचे व्यक्तींच्या यादीत समावेश केला आहे. त्यावेळेस अनेक कागदपत्रे धुंडाळून आणि इतिहास तज्ज्ञांशी चर्चा करून महाराष्ट्र सरकारने २० फेब्रुवारी १८१२ रोजी आचार्य बाळशास्त्री यांचा जन्म झाल्याचे जाहीर केले. तसा जीआर देखील काढला गेला. राज्यातील शासकीय कार्यालयात २० फेब्रुवारी रोजी बाळशास्त्रींची जयंती साजरी केली जाते... अशी माहिती उपलब्ध झाली आहे असे वाचण्यात आले आहे.)

त्याकाळी समाजास प्रबोधनाची मोठी गरज होती. इंग्रजांच्या हातात आपला देश असताना आपल्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करुन परिस्थितीची जाणीव करुन देण्यासाठी एखादे वृत्तपत्र असावे असे बाळ शास्त्रींना वाटले. त्यामुळे इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेत 'दर्पण' ची सुरूवात मुंबई येथे केली.

त्याकाळी सुरु झालेल्या मुद्रणालयाचा त्यांनी समाज प्रबोधनासाठी उपयोग करुन घेतला.२५ जून १८४० साली दर्पणचा शेवटचा अंक प्रकाशित झाला.

दर्पणच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण, मनोरंजन,आणि समाजप्रबोधनाचा हेतू साध्य केला. दर्पण मध्ये एकही जाहिरात त्यांनी छापली नाही. अगदी स्वत:चे पैसे टाकून जवळपास आठ वर्षे लोकांसाठी वृत्तपत्र  सुरु ठेवले. यावरुनच आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचा वृत्तपत्र सुरू करण्यामागील हेतू आणि तळमळ स्पष्ट होते. त्यावेळी गव्हर्नर जेम्स कार्नाक यांनी जस्टीस ऑफ पीस असा किताब देऊन बाळशास्त्रींचा गौरव केला.

वडील गंगाधरशास्त्री हे पंडित तर आई सगुणाबाई धार्मिक. त्यांचाच वारसा बाळशास्त्रींना मिळाला. कोकणांतील पोंभुर्ले या गावी जन्म आणि तद्नंतर मुंबईतील वास्तव्य, शिक्षण, शिक्षणातील अडीअडचणीवर मात केली. बराच खडतर प्रवास बाळशास्त्री यांनी केला. १८२४ च्या सुमारास पोंभुर्ले सोडून बाळशास्त्री मुंबईत आले. इंग्रजी भाषेचा सखोल अभ्यास करुन विविध विषयांचे ज्ञान मिळवून त्याचा उपयोग आपल्या समाजाला कसा होईल याकडे त्यांचा ओढा होता. अगदी वयाच्या अकराव्या वर्षी संस्कृतचे शिक्षण पूर्ण करुन जांभेकरांनी मुंबई गाठली होती. इंग्रजीचे ज्ञान आत्मसात केले. तत्कालीन प्रमुख आठ भाषा व अनेक शास्त्रात ते पारंगत होते. त्यांची ग्रंथसंपदा पुष्कळ होती तसेच त्यांना अनेक सन्मान मिळाले होते. १८३४ साली भारतातील पहिले प्राध्यापक होण्याचा बहुमान बाळशास्त्रींना मिळाला आणि १८४५ साली ते राज्याच्या शिक्षण विभागाचे संचालक झाले. बाळशास्त्रींनी विविध विषयांवर ग्रंथ लिहिले.

आचार्य बाळशास्त्री जांभेकरांबद्दल न्यायमूर्ती ना.ग.चंदावरकर यांनी म्हटले आहे की, ''बाळशास्त्री अव्वल इंग्रजी अंमलातील एक थोर विद्वान तसेच ज्ञानाच्या विविध क्षेत्रात लिलया संचार करणारे पंडित होते.

आचार्य अत्रे यांनी बाळशास्त्री जांभेकरांबद्दल खूपच महत्त्वपूर्ण अशी टिपणी केली आहे. ते लिहितात की, बाळशास्त्री जांभेकर हे बोलके नव्हे तर कर्ते सुधारक होते. केवळ प्राध्यापक म्हणून अध्ययनच न करता बाळशास्त्रींनी आपल्या दर्पण मधून सामाजिक सुधारणेवर भर दिला. दादाभाई नौरोजी हे आचार्य बाळशास्त्रींचे विद्यार्थी होते. बाळशास्त्री जांभेकर हे आद्य मराठी पत्रकार आणि आद्य समाजसुधारक होते. त्यांचे हे महान कार्य पुढील कित्येक पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरत आहे.

समाजातील वर्ण व्यवस्था, जातीभेद, स्त्री दास्य, सती प्रथा, अस्पृश्यता, बालविवाह आदी जुन्या मूल्यांचा पुनर्विचार करण्यास पंडितांना भाग पाडले. समाजातील भेदाभेद गेले पाहिजेत, याची त्यांना जाणीव झाली. हळूहळू समाज प्रबोधनाची प्रक्रिया सुरु झाली. यातच वृत्तपत्रांचे आगमन ही घटना क्रांतीकारक ठरली.

एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेल्या जांभेकरांना आपण दर्पणकार म्हणूनच ओळखतो. ब्रिटिश कालखंडात त्यांनी दर्पणच्या संपादनाची धुरा समर्थपणे वाहिली. भविष्यकाळातील माध्यमाची जबरदस्त ताकद त्यांनी तेव्हाच ओळखली होती. परकीय सत्तेला उलथून टाकायचे असेल तर समाजजागृती घडवायला हवी आणि त्यासाठी लेखणीला पर्याय नाही, हे त्यांना फार पूर्वीच समजले होते.

वृत्तपत्राच्या संपादकाला आवश्यक असणारी भाषेची जाण आणि सामाजिकतेचे भान त्यांच्याकडे होते.

आचार्य जांभेकर हे महाराष्ट्रातील पहिल्या पिढीतील समाजसुधारक होते. दर्पण हे बाळशास्त्रींच्या हातातील एक लोक शिक्षणाचे माध्यम होते. त्यांनी त्याचा उत्तम वापर प्रबोधनासाठी करून घेतला. यात विशेष उल्लेख त्यांनी हाताळलेल्या विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार. बाळशास्त्रींनी या विषयांवर विपुल लेखन केले. त्यामुळे त्यावर विचारमंथन होऊन






त्याचे रूपांतर विधवा पुनर्विवाहाच्या चळवळीत झाले.

ज्ञान, बौद्धिक विकास आणि विद्याभ्यास या गोष्टी त्यांना महत्त्वाच्या वाटत. उपयोजित ज्ञानाचा प्रसार समाजात व्हावा, ही त्यांची तळमळ होती. विज्ञाननिष्ठ मानव उभा करणे हे त्यांचे स्वप्न होते.

सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व ओळखून त्यांनी बॉम्बे नेटिव्ह जनरल लायब्ररीची स्थापना केली. विविध समस्यांवर सकस चर्चा घडवण्यासाठी नेटिव्ह इंप्रुव्हमेंट सोसायटीची स्थापना केली. यातूनच पुढे स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी या संस्थेला प्रेरणा मिळाली व दादाभाई नौरोजी, भाऊ दाजी लाड यांसारखे दिग्गज कार्यरत झाले.१८४० मध्येच त्यांनी ''दिग्दर्शन'' या मराठीतील पहिल्या मासिकाची सुरुवात केली. या मासिकाचे संपादक म्हणून त्यांनी पाच वर्षे काम पाहिले.

या अभिनव माध्यमातून त्यांनी लोकांची आकलन क्षमता वाढवण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या विद्वत्तेला जोड होती ती बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची. संस्कृत, मराठी, इंग्रजी आणि हिंदी, व्यतिरिक्त आठ ते दहा भाषा त्यांना येत होत्या.

या भाषांसह विज्ञान, गणित, भूगोल, शरीरशास्त्र व सामान्य ज्ञान या विषयांवरही त्यांचे प्रभुत्व होते.  मराठीतील वृत्तपत्रांचे जनक असा त्यांचा नावलौकिक आहे. त्याचबरोबर रॉयल एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकात शोधनिबंध प्रसिद्ध झालेले पहिले भारतीय असाही मान त्यांच्याकडे जातो. १८४५ मध्ये त्यांनी केलेले ज्ञानेश्वरीचे मुद्रण हे या ग्रंथाचे पहिले मुद्रण मानले जाते. बाळशास्त्रींनी कुलाबा वेधशाळेचे संचालक म्हणूनही काम पाहिले. तसेच त्यांनी नीतिकथा, इंग्लंड देशाची बखर, इंग्रजी व्याकरणाचा संक्षेप, हिंदुस्थानचा इतिहास, आदी ग्रंथांची निर्मिती केली.

साधारणपणे १८३० ते १८४६ या काळात बाळशास्त्रींनी आपले योगदान देशाला दिले. या काळात समाज बहुसंख्येने निरक्षर, अंधश्रद्धाळू व अज्ञानी होता. म्हणूनच अवघ्या ३४ वर्षांच्या आयुष्यात, विविध क्षेत्रात त्यांनी केलेले प्रचंड कार्य मोलाचे ठरते. सहा जानेवारी रोजी दर्पण चा पहिला अंक प्रकाशित झाला. सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी आपल्या पत्रकारितेचा वापर केला. त्याचबरोबर जातीभेद निर्मूलन आणि विधवा पुनर्विवाह यालाही त्यांनी प्राधान्य दिले. त्यामुळेच त्यांचा उल्लेख ''आद्य समाजसुधारक'' असा केला जातो. १८१२ मध्ये जन्म झालेल्या बाळशास्त्री यांचे वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी १८४६ मध्ये निधन झाले.

मागील काळाचा विचार केला तर, त्यावेळी पत्रकारिता, वृत्तपत्र, हे व्रत होते. परंतु आता बदलत्या काळात त्याने व्यवसायाचे स्वरूप घेतले आहे. आता प्रिंट मीडिया- वृत्तपत्रे, आणि इलेक्ट्रॉनिक मिडीया म्हणजे दूरसंचार सारखी माध्यमे प्रगत झालेली आहेत. पण त्या प्रगती बरोबरच त्यांच्या वर अनेक बंधने आली आहेत. कारण बहुतेक मोठी वृत्तपत्रे आणि दूरसंचार वाहिन्या हे कोणाच्यातरी अधिपत्याखाली आहेत. त्यांची वेगवेगळे मालक आहेत. अर्थातच ही भांडवलदार मंडळी आहेत. आणि आज ही सर्व भांडवलदार मंडळी राजकीय अर्थात सत्ताधारी पक्ष्यांच्या अंकित आहेत. म्हणजेच वृत्तपत्र वाहिन्या यांचे मालकांवर विचाराचा नाही म्हटलं तरी प्रभाव येतोच आणि त्यांच्यावर सरकारची दृष्टी ही असतेच. त्यामुळे त्यांच्या विरोधात जाऊन काही गोष्टी सत्य असल्या तरी दबावामुळे त्या बऱ्याच वेळा समोर येत नाही हे सत्य नाकारून चालणार नाही. मग त्या त्या वेळी जो पक्ष सत्तेवर असतो तो,पक्ष कुठलाही असो. त्यांच्याविरोधात लिहिल्या बातम्यांची नोंद घेतली जाते आणि मग आर्थिक दृष्ट्या मिळणाऱ्या जाहिरातींना फटका बसतो. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत प्रबोधनाचं साधन ते मार्केटिंग असं काही स्वरूप आले आहे. आज असंख्य युट्युब चॅनेल आहेत त्यावरून अनेक प्रकारचे व्हिडिओ प्रसारित केले जातात बऱ्याच वेळा त्याची सत्यता पडताळून पाहिली जात नाही आणि त्याचा परिणाम सामाजिक व्यवस्थेवर होतो.

आताच्या काळात चर्चेमध्ये नेहमीच प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रोनिक मिडिया यांच्यावर आरोप केला जातो कि ते प्रवाहाच्या दिशेने जात असतात किंवा आपल्या मालकांच्या विचाराच्या दिशेने जात असतात,त्यांना त्यांच्याशी जुळवून घ्यावेच लागते. आता वृत्तपत्र व्यवसाय म्हणजे मोठ्या भांडवली गुंतवणूक हे समीकरण झाले आहे. त्यामुळे त्यासाठी जाहिराती हेच मोठं माध्यम आहे. त्यामुळे वृत्तपत्राच्या संपादकाला स्वतःचा म्हणून वेगळा विचार करून वृत्तपत्र चालवता येत नाही. वेगळा विचार मांडता येत नाही.त्या काळात जसे संपादकांच्या अग्रलेखातून परिवर्तन होत असे, आता तसे राहिले नाही . त्याला थोडे फारच वृत्तपत्र अपवाद ठरतील कारण फारच कमी म्हणजे  पाच- दहा टक्के लोकच अग्रलेख, विशेष लेख वाचतात हा निष्कर्ष आहे. आजच्या काळात पत्रकारितेच्या उद्देशात बदल झालेला आहे. पहिल्या पानातच  बातम्यांनी त्यांची भूक भागते असेच काहीतरी झाले आहे.

लोकशाहीच्या चार स्तंभा पैकी माध्यम हा एक महत्त्वाचा चौथा स्तंभ मानला जात आहे. वृत्तपत्रांना समाजमनाचा आरसाही म्हणतात. परंतु सध्याच्या परिस्थितीत तो स्तंभ डळमळीत झाला आहे काय ? त्या आरशात स्पष्ट असे काही दिसत नाही का ?अशी शंका निर्माण होत आहे. अर्थातच वृत्त माध्यमांचे मनोरंजनीकरण झाले आहे, असा सूर अनेकदा होणाऱ्या चर्चांमधून वाचायला ऐकायला मिळतो. अनेकदा अनेक सत्य  समोर आणतांना पत्रकारांवर हल्ले होतात. त्यादृष्टीने अशा पत्रकारांसाठी सुरक्षितता ही आवश्यक आहे. आपले विचार निर्भीडपणे मांडणे आणि आपली विवेकबुद्धी जागृत ठेवणे हे पत्रकारांन साठी महत्त्वाचे आहे. त्यासाठी पत्रकारांनी प्रवाहाच्याच दिशेने वाहत न जाता विरुद्ध दिशेलाही जाण्याचा प्रयत्न करायला हवा आहे. अर्थात केवळ विरोधासाठी विरोध म्हणून नाही. विचार करायची अवस्था निर्माण झालेली आहे. आणि तो झाला तरच अशी समाजमनाच प्रबोधन करणारी पत्रकारिता, शोधपत्रकारिता, टिकणार आहे. आज महाराष्ट्रात दर्पणकार बाळशास्त्रीं च्या स्मृतिप्रीत्यर्थ ''दर्पणदिन'' साजरा करतो. या दिवशी आपण या सर्व गोष्टींचा  एकूणच सामाजिक, राजकीय, आणि प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मिडीया या सर्व पातळीवर विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे असे वाटते. वृत्तपत्र आणि पत्रकारिता हे व्रत म्हणून स्वीकारले जायला हवे.

***

## राही बर्वे यांचा बहुप्रतिक्षित मयसभा ३० जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार....

**ज्योतिर्मय साहित्य**




प्रसिद्ध दिग्दर्शक राही अनिल बर्वे दिग्दर्शित आणि जिरकॉन फिल्म्स निर्मित बहुप्रतीक्षित हिंदी फीचर फिल्म 'मयसभा' सध्या चित्रपटविश्वात विशेष चर्चेत आहे. प्रदर्शनाआधीच या सिनेमाने विविध चित्रपट महोत्सवात आपली दखल घ्यायला भाग पाडले आहे. जावेद जाफरी, मोहम्मद समद, दीपक दामले आणि वीणा जामकर यांचा दमदार अभिनय असलेला हा चित्रपट ३० जानेवारी २०२६ रोजी देशभरात प्रदर्शित होणार आहे. मात्र, त्याआधीच 'मयसभा'ने आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय चित्रपट महोत्सवांच्या व्यासपीठावर आपली ठसठशीत उपस्थिती नोंदवली आहे.

९ ते १५ जानेवारी २०२६ दरम्यान मुंबई आणि ठाणे येथे होणाऱ्या २२ व्या थर्ड आय एशियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'मयसभा'ची इंडियन सिनेमा कॉम्पिटिशनमध्ये अधिकृत निवड झाली असून, रविवार, ११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता रवींद्र नाट्य मंदिर,प्रभादेवी व मंगळवार, दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता सिनेपॉलिस थिएटर, लेकशोर मॉल येथे चित्रपटाचे स्पेशल स्क्रीनिंग होणार आहे.

यानंतर, महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६ ( २०२६) मध्ये 'मयसभा'ची 'इंडियन सिनेमा' विभागात अधिकृत निवड झाली आहे.दिनांक १५ ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या या आंतरराष्ट्रीय महोत्सवात, शनिवार, १७ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७:०० वाजता चित्रपटाचे स्पेशल स्क्रिनिंग होईल.

मानवी नातेसंबंध, भ्रम, स्वार्थ आणि वास्तव यांचा सूक्ष्म व अंतर्मुख वेध घेणारी 'मयसभा' ही कथा प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडणारी आहे. याआधी जागरण फिल्म फेस्टिव्हल २०२५ (मुंबई) च्या समारोप सत्रात चित्रपटाची विशेष दखल घेण्यात आली होती. तसेच, पुण्यातील अण्णाभाऊ साठे फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'मयसभा'ला ओपनिंग फिल्म म्हणून सादर करण्यात आले होते, जिथे चित्रपटाला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद, सकारात्मक चर्चा आणि दमदार वर्ड ऑफ माऊथ मिळाले. त्यावेळी थिएटर मध्ये तुडूंब गर्दी होती, हा प्रतिसाद वाखाणण्याजोगा होता.

आपल्या भावना व्यक्त करताना दिग्दर्शक राही अनिल बर्वे म्हणाले,

''आत्तापर्यंत प्रेक्षकांकडून मिळालेला भरघोस प्रतिसाद अत्यंत प्रेरणादायी आहे. थर्ड आय एशियन फिल्म फेस्टिव्हल आणि पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव या दोन्ही महत्त्वाच्या व्यासपीठांवर 'मयसभा'चे सादरीकरण होणे, आमच्यासारख्या थ्रिलर व वेगळं काहीतरी सांगू पाहणाऱ्या चित्रपटासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. पुणे आणि मुंबईतील विविध रसिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची ही उत्तम संधी आहे. ३० जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या चित्रपटाच्या थिएटरमधील प्रदर्शनाबद्दल आम्ही खूप उत्सुक आहोत.''

'मयसभा'च्या सशक्त क्रिएटिव्ह टीमचे नेतृत्व दिग्दर्शक राही अनिल बर्वे यांनी केले असून, जावेद जाफरी, मोहम्मद समद, वीणा जामकर आणि दीपक दामले यांसारख्या अनुभवी कलाकारांचा प्रभावी अभिनय चित्रपटाला लाभला आहे. जिरकॉन फिल्म्स अंतर्गत गिरीश पटेल आणि अंकूर जे. सिंग या चित्रपटाचे निर्माते आहेत. तसेच शामराव भगवान यादव, चंदा यादव, केवल हंडा व मनीष हंडा हे सहनिर्माते असून चिराग घमंडे सहयोगी निर्माते आहेत. चित्रपटाचे सादरीकरण व वितरण पिकल एंटरटेनमेंटचें प्रमुख समीर दिक्षित व ऋषिकेश भिरंगी हे करत असून, क्रिएटिव्ह कन्सल्टंट म्हणून आशिष निनगुरकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक राही अनिल बर्वे यांच्या तुंबाड या गाजलेल्या कलाकृतीनंतर येणारी ही दुसरी कलाकृती म्हणजेच मयसभा... सध्या विविध चित्रपट महोत्सवांमध्ये दखलपात्र ठरत असलेल्या या सिनेमाची जोरदार चर्चा असून हा सिनेमा  येत्या ३० जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

***

## श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मध्ये सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : येथील श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत नाविन्यपूर्ण पद्धतीने साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फ ुले यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे प्राध्यापक प्रा. सुमित खरात यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सावित्रीबाई फुले यांच्या जीवनप्रवासावर, सामाजिक कार्यावर व शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानावर प्रकाश टाकला. त्यांच्या विचारांचा आजच्या पिढीने कसा स्वीकार करावा, यावर त्यांनी विशेष भर दिला.

यानंतर एमबीए आणि बीसीए विभागाच्या विद्यार्थ्यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे सावित्रीबाई फुले यांचा जीवनप्रवास, त्यांची शिकवण व विविध प्रेरणादायी प्रसंग प्रभावीपणे सादर केले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून सावित्रीबाई फुले यांचे स्त्रीशिक्षणासाठीचे संघर्ष व समाजसुधारणेचे कार्य अधोरेखित झाले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बीसीए विभागप्रमुख प्रा. तृप्ती पांडे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच प्रा. चैताली आंबलकर, प्रा. संगीता पोनारकर, प्रा. पायल नलावडे आणि कार्यालयीन कर्मचारी शैलेश हिरडय यांनी समन्वयक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

श्रीयश प्रतिष्ठानचे माननीय अध्यक्ष यांनी कार्यक्रमाच्या यशाबद्दल संस्थेचे संचालक डॉ. सचिन वानखेडे यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमात एमबीए आणि बीसीए विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

संपूर्ण कार्यक्रमातून सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची प्रेरणा विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचली.

## माणसे बदलत आहेत...

**ज्योतिर्मय साहित्य**

याचा अर्थ असा नव्हे की, खूप सर्दी, खोकला, ताप आहे, अंग खूप दुखत आहे तरी सतत काम करुन दुखणे वाढवून घेणे.

प्रत्येक गोष्टीची काळवेळ आणि समतोल साधला तर जगणे सोपे होते.

आणि कोणी कसे जगावे, हा नियम तर आपण दुसऱ्यावर लादू शकत नाही, पण आपण कसे जगावे हे आपण ठरवू शकतो.

कारण काहीही झाले तरी प्रत्येकाची, आणि प्रत्येक ठिकाणची परिस्थिती वेगळी असते. आणि त्या त्या सोयीप्रमाणे माणूस जगत असतो.

काळ बदलत आहे, नव्हे माणसे बदलत आहेत.

खगोलशास्त्रातले ग्रह गोल तारे तर तेच आहेत.



आकाश तर वरतीच आहे. समुद्र, जमीन ही खालीच आहेत. सर्व ग्रह तारे सुद्धा त्यांच्या स्वतःच्याच स्थानावर, स्वतःच्याच स्वरुपात आहेत.

सूर्यामध्ये कधी शीतलता येत नाही की, चंद्र कधी आग ओकत नाही.

शनी कधी वेगात धावत नाही, की, मंगळ कधी उर्जा गमावत नाही, राहू, केतू ही आपली कामगिरी चोख बजावतात.

गुरु ग्रह संसारात स्थैर्य प्राप्त करुन देतो, बुध ग्रह बुद्धीमत्ता, व्यवहार ज्ञान देतो, शुक्र ग्रह सौंदर्य, कलात्मकता देतो, हर्षल, नेपच्यून, प्लुटो हे ग्रह हा त्यांच्या सामर्थ्या प्रमाणे फळ देतात.



स्वप्न गंधा सतीश आंबेतकर
मुंबई. विरार.

मला वाटते, हे सर्व निर्माण झाले तेंव्हापासून त्यांना निसर्गाने नेमून दिलेले कार्य नियमितपणे आपल्या स्थानावरुन पार पाडत आहेत.

आता हे सर्व शास्त्र खूप गहन आहे, मला तेवढ्या खोलात जायचे नाही.

विचार करतांना सहज बाहेर नजर गेली आणि कळले की, अरे सूर्य तर त्याच्याच जागेवरुन किरणे सोडीत आहे, आकाश ही तेथेच आहे, आपण म्हणतो काळ बदलला, काळ बदलला पण तसे नाही, सांगू पहाता पहाता नजरेसमोरचे अगदी साधे उदाहरण म्हणजे तीस वर्षांपूर्वी खिडकीतून मोकळे आकाश, चंद्र, सूर्य, जीवदानी डोंगर सर्व खिडक्यांमधून सहजपणे दिसायचा. लांब वरचे डोंगर, झाडी दिसायची.

थोडेफार रस्ते, माणसे दिसायची, आमच्या घराच्या आसपास बरीच मोकळी जागा दिसायची.

आणि आता, सर्व बाजूंनी इमारतींनी जागा भरल्या आहेत, फारसे लांबचे निसर्ग दृश्य दिसेनासे झाले आहे. जीवदानी मातेचा डोंगर अस्पष्ट थोडासाच दिसतो.

झाडी वाढली, इमारती वाढल्या, रस्तोरस्ती फेरीवाले, रिक्षावाले, माणसांची गर्दी वाढली नवनवीन वेगवेगळ्या दुकानांची गर्दी वाढली. मराठी जनता कमी आणि इतरांची दाटीवाटी वाढली. गर्दी वाढली, महागाई वाढली, रस्त्यावरुन जाण्यासाठी जागा कमी पडली, नवनवीन बांधकामे, अधिकृत, अनाधिकृत चालूच आहेत.

नवनवीन तोडफोड चालूच आहेत, वाहनांची गर्दी, विक्रेत्यांची गर्दी, घराचे भाव वाढले, सोयी सुविधा वाढल्या, अडचणीही वाढल्या, सारे रंगरूप पालटले.

तीस वर्षांपूर्वी पाच रुपयाला तीन वाटे, फुले, भाज्या मिळणारे आता पन्नास रुपयात तीन वाटे मिळतात. एकंदरीत काय तळागाळापासून सर्वच काही बदलत चालले आहे, हे बदल काळाने नाही, माणसाने बिघडवले आहेत.

निसर्ग घडवत होता, त्यात अति सुधारणा करुन माणूस बिघडवत आहे. काही बदल खूपच चांगले आहेत, पण कुठेतरी थांबायला ही हवे आहे. मध्ये थोडा श्वास घेणे आवश्यक आहे. आपल्याला धावता येते तितकेच धावायला हवे, आपली क्षमता जाणूनच उडी मारायला हवी. दिवसेंदिवस नवी वेगवान, साहसी पिढी निर्माण होत आहे, त्यांना थांबायला वेळच नसतो, या अफाट उर्जेत जुनी माणसे कोलमडून पडत आहेत. काही तग धरुन आहेत, काही पूर्ण थकली आहेत.

पण खरंच,
काळ बदलला की माणूस?

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559